# श्रेष्ठ कोण??

"संत आधी, देव मग" हाचि उगम जाण मना
गर्जून सांगे हे अपूर्व सत्य संत एकनाथ सर्व जना
देव सारे महान् मोठे परि स्वर्गात सुखे राहती
संत महात्मे भूलोकीचे मानवास परि देव भासती
तेज देह धारण करुनि प्राशिती देव अमृत अमरत्वाचे
नरदेही जन्म घेऊनी संत प्राशिती अमृत नामाचे
जीवन सारे जनहितास्तव कल्याण सर्व जगताचे
पूजाअर्चने प्रसाद भोजने देव होती किती संतुष्ट
संत होती दु:खी व्याकूळ मनी पाहता जनकष्ट
व्याकुळ भक्ता ईश्वर दर्शन न सहज घडे कोठे
संत समागम सहज घडतो भाग्य भक्ताचे किती मोठे
संत भूलोकीचे महान् ईश्वर दैवी गुणांचे महान आगर
दया क्षमा शांती अन् भूतदयेचे अथांग सागर
ज्ञान कर्म भक्ती योग साधूनि संतश्रेष्ठ विभूती
मनुज देहातच त्यांच्या महा नारायण होती
श्रेष्ठ यतिवर स्वामी समर्थ अनंत कोटी ब्रह्मांडनायक महान्
त्रैलोक्याचे राजाधिराज परि भक्तासाठी धावत येती वेगवान
सहस्ररश्मींचे तेज झळकते सदैव मुखचंद्रावरी
नरदेही भूलोकावर साक्षात् सूर्यनारायणा परि !!
ध्यानधरणा योगसाधना गिरीगुंफी हिमाचली
जनकल्याण ब्रीद राखण्या भ्रमण सतत भूवरी
नच लागे त्यांना फलपुष्पपूजन अर्ध्यपान
प्रेमभावे स्मरण करिता देती अभयदान
करांगुलीच्या स्पर्शे त्यांच्या नेत्र कटाक्ष करुण टाकिता
प्रसाद अनुपम भुक्तीमुक्तीचा हृदयी अपूर्व सहज शांतता
नजराणा भावभक्तीचा देता स्वामी शिरती हृदयी वेगे
भक्त रंगता नामी त्यांच्या स्वामी प्रसन्न भक्तासंगे
"संत साक्षात् बोलते अर्णव पियुषांचे, चेतना चिंतामणींची गावे मोठी
चला कल्पतरुंच्या बागा" ज्ञानदेव गाती महिमा ओठी

याच कारणे वंदू आधी  सगळ्या संता मग देवा करु प्रणाम
श्री स्वामी चरणी शरण जाउनी स्मरुया त्यांचे पवित्र नाम............

**----हेमा जोशी**